# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक १० एप्रिल, २०१३.
## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत)

**(मंगळवार, दिनांक ९ एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला परंतु पुढे ढकलण्यात आलेला प्रस्ताव) -**

**सर्वश्री. किरण पावसकर,** अशोक ऊर्फ भाई जगताप, हेमंत टकले, जयप्रकाश छाजेड, प्रकाश बिनसाळे, सुभाष चव्हाण, विक्रम काळे, निरंजन डावखरे, मुझफ्फर हुसेन सय्यद, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री.जयवंतराव जाधव, नरेंद्र पाटील, ॲड. जयदेव गायकवाड, श्री. रमेश शेंडगे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

देशाची आर्थिक राजधानी व सर्वात जास्त उत्पन्न असणारी मुंबई महानगरपालिका तसेच झपाट्याने शहरीकरण होत असलेली ठाणे महानगरपालिका व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांची विविध समस्यांमुळे होत असलेली दुरावस्था, याठिकाणी वाढत असलेल्या झोपडपट्टया व वाढत असलेली लोकसंख्या यामुळे तेथील नागरिकांना नागरी सुविधा न मिळणे, मुंबई महानगरपालिकेत रिक्त असलेले भूखंड विकासकांना देवून त्याठिकाणी टॉवर व मॉल उभे असणे, विकासकांबरोबर संगनमत करुन भूखंड विकासकांच्या ताब्यात देण्याचे सुरू असलेले प्रकार, यात प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार होणे, झोपडपट्टी पुनर्विकास योजनेत अनियमितता असून पात्र झोपडपट्टीधारकांना डावलून बनावट सभासद नोंदवून करण्यात येत असलेला प्रचंड भ्रष्टाचार, म्हाडाच्या संक्रमण शिबिरात सुरू असलेली घुसखोरी, नागरिकांना अत्यंत अपुरा पाणीपुरवठा होणे, यासाठी महिलांनी वेळोवेळी धरणे व आंदोलन करणे, बऱ्याच ठिकाणी अस्वच्छता असून जागोजागी कचऱ्यांचे ढीग असणे, मोठ्या प्रमाणात सुरु असलेली बेकायदेशीर बांधकामे, टपऱ्या भंगारवाल्यानी रस्त्यावर केलेले अतिक्रमण यामुळे नागरिकांना रस्त्यांवरुन चालणेही जिकिरीचे होणे, मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईप लाईन्स अत्यंत जीर्ण झाल्या असून पाईप लाईनच्या शेजारी मोठ्या प्रमाणात झोपडपट्टी वाढणे, या झोपडपट्टीत दहशतवादी लपून राहण्याची शक्यता, त्यामुळे सुरक्षेचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, रस्ते दुरुस्तीच्या कामात झालेला कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार, मुंबईत कोलमडून पडलेली वाहतूक व्यवस्था दिवसेंदिवस मालमोटारी व गाड्यांची वाढत असलेली संख्या, वाहतुकीची होत असलेली कोंडी कमी करण्याची व वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याची आवश्यकता, मेट्रोरेल्वे व जलवाहतूक सुरू करण्याबाबत जनतेची होत असलेली मागणी, बऱ्याच ठिकाणी एमएमआरडीएची सुरू असलेली कामे संथगतीने सुरू असणे, या कामात बऱ्याच ठिकाणी झालेले अपघात, त्यात झ

ालेली प्राणहानी, सांडपाण्याची व्यवस्था सुरळीत न ठेवल्याने दूषित पाण्यामुळे मुंबई शहरात डेंग्यु, मलेरिया रोगाची साथ मोठ्या प्रमाणात पसरणे, यात बऱ्याच लोकांचा झालेला मृत्यु, पावसाळ्यात ठिकठिकाणी पाणी तुंबून मुंबईतील जगजीवन ठप्प होणे, मुंबई, ठाणे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील बरीचशी नैसर्गिक तलाव व तळी बुजवून त्यावर अनधिकृत बांधकामे सुरू असणे, मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांची झालेली दुरावस्था, रुग्णांना औषधोपचार वेळीच न मिळणे, मुंबईतील फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात महापालिकेला आलेले अपयश, या समस्यांमुळे तेथील जनतेत निर्माण झालेली असंतोषाची भावना, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी.

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(अ) तारांकित प्रश्न.**

**(ब) तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**कृषी मंत्री** : "परभणी येथील मराठवाडा कृषी विद्यापीठाने बांधकाम विभागात केलेला गैरव्यवहार" या विषयावरील श्री.सतीश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.एम.एम.शेख, श्री.हेमंत टकले, श्री.रमेश शेंडगे, डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ३३४३७ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१२ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती, सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे -**

**(१) उद्योग मंत्री** : **(अ)** "पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा एक्केचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** "कोंकण विकास महामंडळ मर्यादितचा सन २००४-२००५ या वर्षाचा चौतीसावा वार्षिक अहवाल व लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : **(अ)** "शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन

२००९-२०१० व २०१०-२०११ या वर्षांचा अनुक्रमे सत्तेचाळीसावा व अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** "शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(क)** "पुणे विद्यापीठ, पुणे यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा वार्षिक लेखे संविधानिक लेखा परीक्षकांचा लेखापरिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ड)** "सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक लेखापरिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ई)** "गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक लेखे अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) कामगार मंत्री : (क)** "नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नाशिक यांचा सन २०१०-२०११ व २०११-२०१२ या वर्षांचा अनुक्रमे सव्वीसावा व सत्तावीसावा लेखापरिक्षण अहवालासह वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "नाशिक जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ (लासलगांव) यांचा सन २००९-२०१० व २०१०-२०११ या वर्षांचा अनुक्रमे एकवीसावा व बावीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "दि रेल्वे गुडस् क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंटस लेबर बोर्ड मुंबई यांचा सन २००९-२०१० व २०१०-२०११ या वर्षांचा अनुक्रमे तेहेतीसावा व चौतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "किराणा बाजार व दुकाने मंडळ (बृहन्मुंबई, ठाणे आणि

रायगड जिल्ह्यांकरिता) यांचा सन २००९-२०१० व २०१०-२०११ या वर्षांचा अनुक्रमे चाळीसावा व एकेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक, २०११ च्या संबंधात मा.राज्यपाल यांच्याकडून आलेला संदेश.**

**चार : लोकलेखा समितीचा अकरावा अहवाल सादर करणे.**

**पाच : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना - (असल्यास).**

**सहा : म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - (असल्यास).**

**सात : (अ) लक्षवेधी सूचना - (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -**

(१) **(सोमवार, दिनांक २५ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना ) -**

**श्री. किसनचंद तनवाणी वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **अल्पसंख्याक विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यात अल्पसंख्याकबहूल शाळांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता दरवर्षी २ लाखांचे अनुदान देण्यात येणे, याकरिता शाळेतील एकूण विद्यार्थ्यांपैकी ७० टक्के विद्यार्थी अल्पसंख्याक असणे, बंधनकारक असतांनाही औरंगाबाद जिल्हापरिषदेच्या समाजकल्याण विभागाने सन २०१०-११ या आर्थिक वर्षात नियमांचा भंग करत अपंग शाळांना अल्पसंख्याकबहुल दाखवून लाखो रुपयांचे अनुदान वाटप करण्याची शिफारस करण्यात आल्याचे नुकतेच उघडकीस येणे, तसेच गटशिक्षणाधिकाऱ्यांचा दाखला न घेताच सदरहू अनुदानाचे वाटप करण्यात येणे, याबाबत वारंवार संबधितांकडे तक्रार करण्यात येऊन त्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन संबधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(२) **प्रा. सुरेश नवले,** सर्वश्री. संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, चरणसिंग सप्रा, सुभाष चव्हाण, डॉ.सुधीर तांबे **वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"औरंगाबाद शहराच्या स्थापनेपासून चारशे वर्षापूर्वीचा ऐतिहासिक वारसा असलेल्या "नहरे अंबरी" या पाणीपुरवठा व्यवस्थेकडे महापालिका व प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याने सदरहू ऐतिहासिक पाणी ठेवा नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, सद्य:स्थितीत पैठणच्या जायकवाडी जलाशयातून शहराला पाणीपुरवठा होत असला तरी, धरणातील अपुरा पाणीसाठा व दुष्काळी स्थितीमुळे तीन दिवसाआड पाणीपुरवठा होत असणे, काही वीटभट्टी मालक "नहरे अंबरी" पाणीपुरवठा व्यवस्था फोडून त्यातील पाण्याचा वापर करीत असणे, संबंधित प्रशासन या गैरवापरास अटकाव करीत नसल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिडीची व असंतोषाची भावना, शासनाने या प्रकरणी त्वरीत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **श्रीमती विद्या चव्हाण वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"धुळे जिल्ह्यातील नगावबारी येथे बेबीबाई चौधरी व तिचा मुलगा गणेश चौधरी यांनी गरीब असहाय्य अल्पवयीन मुलींना गुंगीचे औषध देऊन त्यांना जबरदस्ती वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडण्याचे नुकतेच उघडकीस येणे, मुलींनी विरोध केला तर त्या मुलींना जबर मारहाण करण्यात येणे, त्यांच्या अंगावर साप व कुत्री सोडण्यात येणे, बेबीबाई चौधरी ही तिच्या हस्तकांद्वारे नाशिक, शिरपूर, धुळे, जळगांव येथून अल्पवयीन मुलींना पळवून आणत असणे, तेथील पोलीसांच्या संगनमताने हा व्यवसाय सुरु असल्याची व्यक्त होत असलेली शंका, आरोपीवर अद्यापही कारवाई न होणे, त्यामुळे तेथील नागरिकांत पसरलेला तीव्र संताप, बेबीबाई चौधरी, तिचा मुलगा व इतर हस्तक यांच्याविरुध्द शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री. रामनाथ मोते,** विनोद तावडे, भगवान साळुंखे, नागो गाणार **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अन्वये, इ. १ ली ते इ.८ वीच्या प्राथमिक शिक्षकांकरीता शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता वाढविण्याबाबत व शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य करण्याबाबत शासनाने

दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ च्या शासन निर्णयानुसार धोरणात्मक निर्णय घेणे, त्यानुसार इ.६ वी ते इ.८ वीसाठी किमान शैक्षणिक पात्रता पदवी व शिक्षणशास्त्र पदविका अशी वाढ करणे, सेवेत असलेल्या शिक्षकांसाठी दिनांक ३१ मार्च, २०१५ पर्यंत शैक्षणिक पात्रता वाढविण्यास मुदत देणे, सेवेत असलेल्या शिक्षकांनासुध्दा पात्रता परीक्षा देण्याची तरतूद करणे, दिनांक ६ मार्च, २०१३ च्या निर्णयानुसार सेवेत असलेल्या शिक्षकांसाठी पात्रता परीक्षा पास होण्याचे (टी.ई.टी.) बंधन रद्द करणे, सध्या प्राथमिक शाळांमध्ये एस.एस.सी./एच.एस.सी. व शिक्षणशास्त्र पदविकाधारक हजारो शिक्षक सेवेत असून तत्कालीन प्रचलित नियमानुसार त्यांच्या नियुक्त्या असूनही १ वर्षापासून ३१ वर्ष सेवा केलेल्या शिक्षकांना पदवी प्राप्त करण्याचे टाकलेले बंधन नियमबाह्य असणे, वाढीव शैक्षणिक पात्रतेचा नियम पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणे हे नैसर्गिक न्याय तत्वाविरुध्द असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **सर्वश्री. मितेश भांगडिया,** नागो गाणार, विनोद तावडे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **पर्यावरण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"विदर्भातील तालुका व जिल्हा वर्धा येथील शेकडो एकर क्षेत्रात असलेल्या लॅन्को थर्मल पॉवर प्रकल्पाला २८५८ घनमीटर पाणी प्रती तास आवश्यक असताना विदर्भ जलसिंचन विकास मंडळाने ४६०० घनमीटर पाणी प्रती तास इतक्या मोठया प्रमाणावर दिलेली परवानगी, यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना शेतीकरीता पाण्याची कमतरता भासणे, तसेच स्थानिक नागरीकांना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उभा राहणे, या प्रकल्पाच्या जागेपासुन १० किलो मीटर परीसरामध्ये १३ आरक्षित वनांचा समावेश असून प्रकल्प पुर्णावस्थेत सुरु झाल्यास होणाऱ्या प्रदुषणामुळे संरक्षित वने व परिसरातील सर्व शेतातील पिकांना प्रदुषित राखेच्या उर्त्सजनामुळे धोका संभवणे, प्रदुषण नियंत्रण मंडळाने घातलेल्या अटीनुसार या प्रकल्पामार्फत हरीत पट्टयाची अजुनही लागवड न होणे, प्रकल्पातुन उत्सर्जनामुळे निघणाऱ्या राखेमुळे सामान्य नागरीकांच्या आरोग्याला हानी पोचणे, नागरीकांना श्वसनक्रीयेचा त्रास सुरु होणे, प्रकल्प क्षेत्रालगत ४ छोटी धरणे असून त्या सर्व धरणातील पेय जल प्रदुषित होण्याचा धोका, यामुळे सामान्य जनतेमध्ये निर्माण

झालेले भितीचे वातावरण, या प्रदुषण समस्येवर तातडीने नियंत्रण करण्याची तसेच जास्तीत जास्त स्थानिकांना या प्रकल्पात रोजगार उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, यावर शासनाने त्वरीत करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

**(ब) लक्षवेधी सूचनेसंदर्भातील अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**गृहमंत्री** : "मौजे केट्टापाट (ता.कळमेश्वर, जि.नागपूर) येथील रिक्षा अपघातामध्ये १४ जणांचा झालेला मृत्यू " श्री.हेमंत टकले व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी दिनांक २८ जुलै, २०११ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती, सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**आठ : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

# - मध्यंतर -

**नऊ : म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

**(अ) (मंगळवार, दिनांक ९ एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला परंतु पुढे ढकलण्यात आलेला प्रस्ताव) -**

**सर्वश्री. विनोद तावडे,** दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ. दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री. रामनाथ मोते, सुमंतराव गायकवाड, ॲड. आशिष शेलार, ॲड. अनिल परब, डॉ.रणजीत पाटील, सर्वश्री. नागो गाणार, भगवान साळुंखे **वि.प.स. यांचा प्रस्ताव -**

"गत ३६ महिन्यात वीजेचे दर तब्बल १२ वेळा वाढणे, औद्योगिक वीजेचे दरदेखील शेजारील राज्यांपेक्षा अधिक असल्याने सर्व उद्योजकांनी एक दिवसाचा लाक्षणिक संप पुकारून तो यशस्वी करणे, वारंवार वीज दरवाढ करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाने कोणातही विरोध न करता मंजूर करणे, भारनियमनमुक्तीसाठी महानिर्मितीच्या औष्णिक विद्युतनिर्मिती प्रकल्पांची वीजनिर्मिती वाढविण्याची गरज असताना प्रत्यक्षात सद्य:स्थितीत महानिर्मितीच्या औष्णिक वीज प्रकल्पांमार्फत होणारी वीज निर्मिती सन २००८ च्या तुलनेत कमी होणे, तसेच

उरण व लातूर येथील गॅसवर आधारित विद्युत निर्मिती प्रकल्पामधून अपेक्षित विद्युत निर्मिती न होणे, प्रत्यक्ष वीजनिर्मितीत वाढ न झाल्याने माहे डिसेंबर, २०१२ अखेर राज्य भारनियमनमुक्त करण्याची घोषणा फसवी ठरणे, कृषीपंपांना मोफत वीज पुरविण्याची घोषणा करूनदेखील कृषीपंप धारकांकडून वाढीव दराने वीज बील आकारण्यात येणे, महाराष्ट्रातील महावितरण, महापारेषण व महाजनको या तीनही कंपन्यांचे कामकाजामध्ये प्रचंड भ्रष्टाचार होत असल्याचे उघडकीस येणे, यामध्ये प्रामुख्याने मीटर खरेदी, कोळसा खरेदी, पायाभूत सुविधांची कामे, महापारेषणमार्फत होणारी कामे इत्यादींचा समावेश असणे, इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील वीज कंपन्यांचे काम समाधानकारक नसल्याचे शुंगलु समितीने देखील आपल्या अहवालात नमूद करणे, परिणामी, वाढत्या वीजदराचा बोजा सामान्य जनतेवर पडत असल्याने त्यांच्यात निर्माण झालेला तीव्र असंतोष, यामुळे या विभागातील कारभाराबाबत श्वेतपत्रिका काढण्याची होत असलेली मागणी व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**दहा : शासकीय विधेयके -**

**(अ) विचार पुढे सुरू, खंडशः विचार व संमत करणे -**

सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३.

**(क) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सद्य अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सद्य अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर

करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३.

**(क) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रामदास कदम वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**अकरा : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये - (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्री. अमरसिंह पंडित व इतर वि.प.स.पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"शिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांना ईसीएसव्दारे वेतन व त्यासाठी १०० टक्के वेतन अनुदानाचे शासन धोरण असणे, परंतू औषध निर्माण शास्त्र पदविका संस्थेतील कर्मचाऱ्यांना नियमित वेतन न मिळणे, सहा महिन्यांपासुन वेतन न मिळाल्यामुळे कुटुंबावर

उपासमारीची वेळ येणे, कर्मचारी संघटनांनी आंदोलनाचा इशारा देणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री. जयवंतराव जाधव व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"कामगार व त्यांच्या कुटुंबियांना मोफत उपचार देण्यासाठी राज्यकामगार विमा योजने अंतर्गत वेतनातून दरमहा रु. १०० ते ३०० हप्ता कपात केला जात असल्याने त्या बदल्यात शासनाने कामगारांना सुसज्ज रुग्णालयाद्वारे वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्याची मागणी असणे, नाशिक जिल्ह्यातील सिन्नर औद्योगिक वसाहतीमध्ये कामगारांसाठी व मालेगांव शहरातील हजारो यंत्रमाग व हातमाग कामगारांना इ.एस.आय.एस.सुविधा लागू करुन सिन्नर व मालेगांव येथे सुसज्ज कामगार रूग्णालये सुरु करण्यासाठी शासनाकडे कामगार संघटनांची व जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींची मागणी प्रलंबित असणे, नाशिक शहरामध्ये सातपूर, अंबड व गोंदे ह्या तीन औद्योगिक वसाहतीमध्ये हजारो कामगार काम करत असल्याने त्यांच्यासाठी असलेल्या नाशिक शहरातील कामगार राज्य विमा योजना रुग्णालयांची दुरावस्था दुर करुन येथे सुसज्ज कामगार रुग्णालय सुरु करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ९ एप्रिल, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.